# उच्च न्यायालय, मुंबई

उच्च न्यायालय, मुंबई, मुख्यालय मुंबईच्या आस्थापनेवर खाली नमूद केलेल्या पदाकरिता उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी, २ वर्षांकरिता तयार करण्यासाठी जाहिरात प्रसिध्दिच्या दिनांकास पात्रता धारण करणा—या उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

<table>
<tr><th rowspan="2">पदाचे नाव</th><th colspan="2">एकूण रिक्त पदे</th><th rowspan="2">दिव्यांगासाठी आरक्षण पदे (४%)</th><th colspan="2">एकूण पदे</th><th rowspan="2">नियमाप्रमाणे शिपाई/हमाल या पदाची वेतन मॅट्रिक्स</th></tr>
<tr><th>सद्य:— स्थितीत रिक्त असणारी पदे</th><th>पुढील दोन वर्षात रिक्त होणारी पदे</th><th>निवड यादी</th><th>प्रतिक्षा यादी</th></tr>
<tr><td rowspan="2">शिपाई/ हमाल</td><td>२४</td><td>१०९</td><td rowspan="2">५</td><td rowspan="2">१२८</td><td rowspan="2">३२</td><td rowspan="2">एस—१<br>₹ १५,०००—<br>₹ ४७,६००/—<br>व नियमाप्रमाणे भत्ते</td></tr>
<tr><td colspan="2">१३३</td></tr>
</table>

चाचणीसाठी व मुलाखतीसाठी उमेदवारास स्वखर्चाने हजर रहावे लागेल. नियुक्ती (Appointment) व अल्पसुचीचे (Shortlisting) सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

## अ) पात्रता :—

१) उमेदवार कमीत—कमी सातवी पास असावा.

२) जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेस उमेदवाराचे वय किमान १८ वर्ष व कमाल ३८ वर्ष असावे. मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष राहील. न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांना वयाची अट नाही.

## ब) पात्र उमेदवारीकरीताच्या अटी:—

१) तो/ती करार करणेस सक्षम असावा/असावी.

२) त्याला/तिला नैतिक पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आले नसावे किंवा त्याला/तिला कोणत्याही न्यायालय/ एम.पी.एस.सी./यु.पी.एस.सी. किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडींमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे काढून टाकले नसावे किंवा अपात्र ठरवले नसावे.

३) त्याला/तिला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवले नसावे किंवा त्याच्या/तिच्याविरुद्ध फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

४) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ नुसार, उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास, २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे, हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक नसावी.

## क) अर्ज करण्याची पध्दत :—

१) अर्ज सादर करतांना https://bombayhighcourt.nic.in या वेबसाईट वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करुनच अर्ज सादर करावा.

३/ .......

२) ऑनलाईन अर्ज जाहिरात प्रसिद्धिच्या दिनांकापासून **१५ दिवसात** करावा. प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकाराने अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

३) पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज https://bombayhighcourt.nic.in या वेबसाईटद्वारे दिनांक २४/०३/२०२३ ते दिनांक ०७/०४/२०२३ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्जाची लिंक दिनांक २४/०३/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडेल आणि दिनांक ०७/०४/२०२३ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता बंद होईल.

४) ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना उमेदवाराने स्वत:चा अद्यावत पासपोर्ट साईज चा फोटो (३.५ सें.मी. X ४.५ सें.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी (३ सें.मी. X २.५ सें.मी.) स्कॅन करुन ४० KB पेक्षा कमी आकाराच्या दोन स्वतंत्र फाईल्स **jpg/jpeg format** मध्ये करुन ऑनलाईन अर्जात दर्शविलेल्या ठिकाणी सदर फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे अनिवार्य आहे. **(टिप.** फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी) प्रवेशपत्रावर/अर्जावर दुस—याचा फोटो/स्वाक्षरी असल्यास उमेदवारास निवडीच्या टप्प्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

४/ .......

५) उमेदवाराने https://bombayhighcourt.nic.in या वेबसाईट वर क्लिक करुन **Recruitment** मध्ये **'Peon/Hamal'** च्या **Apply Online** वर क्लिक करावे तद्‌नंतर **SBI Collect** द्वारे ऑनलाईन फी भरावी तद्‌नंतर **SBI Collect Reference No.** प्राप्त होईल तद्‌नंतर ऑनलाईन फॉर्म भरावा.

६) उमेदवाराने आपली सर्व माहिती योग्यरित्या भरुन झाल्यावर सर्वांत शेवटी **I Agree** बटणावर क्लिक करुन अर्ज सादर (Submit) करावा. (एकदा माहिती सादर (Submit) केल्यानंतर उमेदवाराला ऑनलाईन अर्जामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. तसेच त्यासंदर्भात उच्च न्यायालय प्रशासनाकडून कोणतीही तक्रार/दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही).

७) उमेदवारांनी संपूर्ण जाहिरातीचे वाचन करूनच अर्ज भरावा. संपूर्ण भरलेला अर्ज सादर **(Submit)** केल्यानंतर उमेदवाराने Print Application मध्ये जाऊन Registration ID No टाकून Print काढून त्या **Printout** वर दिलेल्या जागेवर स्वत:चा अर्ज भरतांना **Upload** केलेला फोटो चिटकवावा आणि विहित जागेवर काळया पेनाने स्वाक्षरी करावी. अर्जाचे **Printout** स्वत:कडे जतन करून ठेवावे. सदरील अर्ज आणि शैक्षणिक कागदपत्रे या कार्यालयात **पोस्टाने पाठवू नये**. मात्र निवड प्रक्रियेदरम्यान दिलेल्या सूचनेनुसार आवश्यक त्या—त्यावेळी सदरील अर्जाची प्रत उपलब्ध करावी.

८) ऑनलाईन फॉर्म भरत असताना आपण जाहिरातीतील नमुद शैक्षणिक पात्रता व इतर बाबींची पूर्तता केली असेल तरच आपला अर्ज स्विकारला जाईल.

९) परीक्षेच्यावेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणि पडताळणीसाठी स्वत:चे आधारकार्ड/पॅनकार्ड/वाहन परवाना इ. ओळखपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१०) उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची (कार्यालयाची) मंजूरी घेतल्याचे ना—हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

## ड) उमेदवारांकरीता सूचना :—

१) अर्जदाराने ऑनलाईन अर्ज करतांना **शुल्क ₹ २५/—** भरणे आवश्यक आहे आणि ते शुल्क परत मिळणार नाही.

२) अर्ज शुल्क भरल्याशिवाय अर्जदारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

३) उमेदवाराने एकापेक्षा जास्त ऑनलाईन अर्ज सादर केल्यास त्याच्या/तिच्या फक्त शेवटच्या अर्जाचा विचार करण्यात येईल.

४) अल्प सूचीची यादी **(Shortlisting)** उच्च न्यायालयाच्या संकेत स्थळावर **(https://bombayhighcourt.nic.in)** प्रकाशित झाल्यानंतर ज्या अर्जदारांचे नाव अल्प सुची मध्ये आहे त्यांनी **शुल्क ₹ १२५/—** भरणे आवश्यक आहे. सदर शुल्क परत केले जाणार नाही.

## इ) आॅनलाईन शुल्क भरण्याची पध्दत:—

१) उमेदवाराला नोंदणी **शुल्क ₹ २५/— 'SBI Collect'** द्वारे ऑनलाईन पेमेंट करणे आवश्यक आहे.

२) उमेदवारांना **'SBI Collect'** सुविधेद्वारे ऑनलाईन पेमेंटसाठी **'User Mannual'** मध्ये दिलेल्या निर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे.

३) अर्ज स्वीकारण्यासाठी फक्त यशस्वी पेमेंट झालेल्या व्यवहारांचाच विचार केला जाईल.

४) **'SBI Collect'** सुविधेद्वारे तयार केलेले नियम, अटी व शर्तीची कोणतीही जबाबदारी मुंबई उच्च न्यायालय प्रशासनाची नाही. ऑनलाईन पेमेंट करताना काही तांत्रिक बिघाड झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. या बाबत कोणत्याही स्वरूपाची चौकशी/दाव्याची दखल घेतली जाणार नाही.

## फ) ज्या उमेदवारांना मुलाखतीकरीता बोलवण्यात येईल, त्यांनी खालील कागदपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती त्यांच्या मुळ प्रमाणपत्रांसह पडताळणीसाठी मुलाखतीच्या वेळी सोबत आणाव्यात :

१) जन्मतारखेच्या पुराव्याचा दाखला. (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/जन्म प्रमाणपत्र/एस.एस.सी. चे बोर्ड प्रमाणपत्र)

२) शैक्षणिक पात्रतेच्या परिक्षेचे गुणपत्रक. (७वी, १०वी, १२वी किंवा तत्सम डिप्लोमा कोणत्याही मान्यता प्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठातून प्राप्त केलेला, इत्यादी)

७/ .......

३) शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र. **(१०वी, १२वी, किंवा तत्सम डिप्लोमा कोणत्याही मान्यता प्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठातून प्राप्त केलेला, इत्यादी).**

४) जाहिरात प्रसिध्दी नंतरची तारीख असलेली दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी दिलेली चारीत्र्य संपन्नतेविषयीचे प्रमाणपत्र. (अर्जासोबत ऑनलाईन **Form- 'A'** नमुन्यात)

५) सक्षम अधिका—याने प्रदान केलेला जातीचा दाखला. (मागासवर्गीयांसाठी).

६) विशेष अर्हता असल्याबाबतचा दाखला.

७) महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

८) सेवायोजन कार्यालयात नोंदणी केली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

९) उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिका—यांची (कार्यालयाची) मंजुरी घेतल्याचे ना—हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

१०) विवाहित महिला उमेदवाराच्या बाबतीत जर तिने लग्नानंतर तिचे नाव बदलले असेल तर तिच्या नावाच्या बदला बाबत दस्तऐवज जसे की, शासकीय राजपत्र, सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह प्रमाणपत्राची प्रत इत्यादी.

११) संबंधित इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन अर्जामध्ये दिलेल्या माहितीसह.

१२) न्यायालय प्रशासनाने मागणी केल्यास इतर आवश्यक दस्तऐवज.

८/ .......

## ग) उमेदवारांकरीता इतर महत्वाच्या सूचना :—

१) उमेदवारास मराठी भाषा बोलता, वाचता आणि लिहीता येणे आवश्यक आहे.

२) परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे, याबाबत सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

३) सदरहू जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या पद संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. कोणत्याही कारणास्तव पदे कमी/जास्त झाल्यास निवड केलेल्या उमेदवारास नियुक्तीबाबत हक्क प्रस्थापित करता येणार नाही अथवा निवड प्रक्रिया रद्द झाल्यास कोणताही दावा सांगता येणार नाही.

४) सदरहु पदे जशी जशी रिक्त होतील त्यानुसार नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

५) अर्जदार जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र आहे असे समजून त्याला लेखी परीक्षेकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. मुलाखती/नियुक्ती पूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास नियुक्ती करण्यात येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

६) जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येनुसार व उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्तेनुसार **अल्प सुची (Shortlisting)** करण्याचे व त्यानुसार लेखी परीक्षेसाठी आणि/किंवा निवड प्रक्रियेच्या कुठल्याही टप्प्यावर, पात्र उमेदवारांची निवड करण्यासाठी गुणमर्यादा ठरविण्याचे सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, मुंबई यांनी आपल्याकडे राखून ठेवले आहेत.

७) केवळ अर्ज दाखल केला यावरुन मुलाखतीचा किंवा नेमणूकीचा हक्क प्रस्थापित होणार नाही. तसेच उमेदवाराची उच्च शैक्षणिक पात्रता हा सदर पदाच्या निवडीसाठी मुख्य आधार मानला जाणार नाही.

८) आलेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर अल्प सुची प्रमाणे पात्र उमेदवारांना खालील निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

| **क्र.** | **परीक्षेचा प्रकार** | **गुण** | **अभ्यासक्रम** |
|---|---|---|---|
| १) | लेखी परीक्षा | ३० गुण | लेखी चाचणीसाठी प्रश्नपत्रिकेमध्ये वस्तुनिष्ठ नानाविध निवडीचे प्रश्न असतील. **(objective type multiple choice questions)** |
| २) | शारीरिक क्षमता आणि विशेष अर्हता | १० गुण | —— |
| ३) | तोंडी मुलाखत | १० गुण | —— |

**टीप:** लेखी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना शारीरिक क्षमता आणि विशेष अर्हता या परीक्षेस बोलवण्यात येणार नाही.

९) शारिरीक क्षमता आणि विशेष अर्हता तसेच मुलाखतीसाठी बोलावण्यात येणा—या उमेदवारांनी त्यांनी अर्जासोबत नमुद व दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रति पडताळणीसाठी आणाव्यात. तसेच या कार्यालयास मान्य होईल असे स्वत:चे फोटो प्रमाणपत्र (Photo ID) जसे मतदार कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना यापैकी एखादा पुरावा आणावा.

१०) **उमेदवारी अर्ज नाकारण्यात आलेल्या विरूध्दची निवेदने, उमेदवारी अर्ज नाकारण्याची यादी प्रसिध्द झाल्यानंतर १० दिवसात करावीत. त्यानंतर आलेल्या निवेदनांचा विचार करण्यात येणार नाही.**

११) पात्र उमेदवारांना नेमलेल्या तारखांना लेखी परीक्षांसाठी, शारिरीक क्षमता आणि विशेष अर्हता व तोंडी मुलाखतीसाठी नेमलेल्या तारखांना **स्वःखर्चाने** हजर राहावे लागेल.

१२) कार्यालयाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षीत घटनेमुळे भरती प्रक्रियेचे वेळापत्रक बदलू शकते असा बदल वेळोवेळी उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल. **त्याकरीता उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळावर लक्ष ठेवावे.**

१३) उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतची सूचना उशीरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेस लेखी परिक्षेस, शारिरीक क्षमता आणि विशेष अर्हता किंवा मुलाखतीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास, उच्च न्यायालय प्रशासनाकडून याबाबत कोणतीही तक्रार/दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही.

१४) अपुर्ण अथवा चुकीची माहिती असेलेला अर्ज प्रथम पडताळणीच्या टप्प्यात नाकारला जाईल. तसेच कोणतीही वस्तुस्थिती दडपल्यास अर्ज नाकारला जाईल. उमेदवाराने दिलेला कोणताही तपशील खोटा किंवा चुकीचा असल्याचे आढळल्यास, उमेदवाराला निवड प्रक्रियेत भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही.

१५) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल अथवा नियुक्त झाल्यास त्याला/तिला पदावरून काढून टाकण्यात येईल.

१६) अल्पसुचीत पात्र उमेदवारांसाठी लेखी परीक्षा व शारीरिक क्षमता व विशेष अर्हता चाचणीचे तसेच तोंडी मुलाखतीचे वेळापत्रक मुंबई उच्च न्यायालयाचे संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात येईल. उमेदवाराने परीक्षेचे प्रवेश प्रमाणपत्र 'Admit Card' वर क्लिक करुन प्रिंट काढून घ्यावे.

१७) उमेदवाराने लेखी परीक्षा तसेच शारिरीक क्षमता व विशेष अर्हता चाचणी मध्ये मिळविलेल्या गुणांच्या आधारे, तसेच त्याच्या अर्जाची छाननी व त्याने तोंडी मुलाखतीचे वेळेस हजर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर उमेदवारांची तोंडी मुलाखतीची पात्रता अंतिमरित्या ठरविण्यात येईल व त्याच उमेदवारांची तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

१८) उमेदवारांची निवड ही लेखी, शारिरीक क्षमता व विशेष अर्हता चाचणी आणि मुलाखतीत मिळविलेल्या गुणांच्या आधारे केली जाईल.

१९) मंजुर केलेली **निवड यादी** ही प्रसिद्धीच्या दिनांकापासून फक्त २ वर्षासाठीच वैध राहिल. त्यास मुदतवाढ न दिल्यास सदरची निवड यादी रद्द करण्यात येईल.

२०) मंजुर केलेली **प्रतिक्षा यादी** ही प्रसिद्धीच्या दिनांकापासून फक्त २ वर्षासाठीच किंवा सदर पदासाठी नवीन निवड/प्रतिक्षा यादी प्रसिद्ध होईपर्यंत, जे प्रथम घडेल तो पर्यंत वैध राहिल.

२१) निवड/प्रतिक्षा यादीतील उमेदवार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत कर्तव्यात सामिल होऊ शकला नाही तर त्याचे नाव निवड/प्रतिक्षा यादीतून काढून टाकले जाईल.

१२/.......

२२) निवड यादीतील उमेदवार त्याला दिलेल्या वेळेत कर्तव्यावर हजर न झाल्यामुळे किंवा निवड यादीतील उमेदवाराने नियुक्त झाल्यापासून १ वर्षाच्या आत राजीनामा दिल्यामुळे, रिक्त होण्या—या पदासाठी जर त्यावेळेस निवड यादी संपली असेल, तरच त्यावेळेस प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचा विचार करण्यात येईल.

२३) निवड यादीतील उमेदवारांची नियुक्ती सुरुवातीला दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्याबद्दल प्रमाणपत्र जारी होईपर्यंत नियुक्तीच्या सेवा कोणत्याही वेळी, कोणतीही नोटीस न देता किंवा कोणतेही कारण न देता संपुष्ट करण्यात येतील.

२४) **उमेदवाराने निवड समितीच्या सदस्यांना किंवा उच्च न्यायालयात काम करण्या—या अधिका—यांना/ कर्मचा—यांना भेटण्याचा किंवा त्यांच्यावर त्याच्या निवड प्रक्रियेसंबंधी व्यक्तीशः अथवा इतर कोणामार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला/तिला निवड प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल व यासंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.**

२५) या निवड प्रक्रियेत निवड समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल.

**आदेशावरून**

**सही/—**

**महाप्रबंधक**

**दिनांक : २१ मार्च, २०२३**

**मुंबई येथील उच्च न्यायालयाचा न्यायाधिकार**

# ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शक सूचना

१. संगणकीकृत प्रोग्रामद्वारे ऑनलाईन अर्जाची छाननी केली जाईल म्हणून ऑनलाईन अर्ज भरणे सुरु करण्यापूर्वी उमेदवाराने शिपाई/हमाल पदासंबंधीची संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचावी. ऑनलाईन अर्ज हा इंग्रजी भाषेत भरला जाईल.

२. **'शिपाई/हमाल' पदासाठी इ. ७ वी मधील गुण नमूद करणे अनिवार्य असेल. 'शिपाई/हमाल' पदासाठी जर उमेदवार इ. ७ वी ची परीक्षा उत्तीर्ण असेल आणि पुढील उच्च अर्हता प्राप्त उदा. १० वी किंवा १२ वी असेल व त्याच्याकडे/तिच्याकडे इ. ७ वी चे गुणपत्रक नसेल तर, त्याने/तिने 'ऑनलाईन' अर्ज भरताना इ. ७ वी करिता काल्पनिकरित्या ५०% गुणांची (उदा. एकूण १०० पैकी ५० गुण प्राप्त) नोंद करावी जेणेकरुन त्याचा/तिचा अर्ज संगणकाकडून स्विकृत केला जाईल.**

३. ऑनलाईन अर्जातील माहिती भरण्यापूर्वी उमेदवाराने नोंदणी शुल्क **₹ २५/— 'SBI Collect'** द्वारे ऑनलाईन पेमेंट गेटवे (Payment Gateway) या सुविधेद्वारे ऑनलाईन शुल्क भरावे तद्नंतर **SBI Collect Reference No.** प्राप्त होईल तद्नंतर ऑनलाईन अर्ज भरावा.

४. ऑनलाईन अर्जातील संपूर्ण माहिती अचुक भरणे उमेदवारास बंधनकारक आहे.

५. ऑनलाईन अर्ज भरणे सुरु करण्यापूर्वी उमेदवाराने स्वत:चा अद्यावत पासपोर्ट फोटो आणि स्वाक्षरी स्वतंत्र स्कॅन करुन ४० **KB** पेक्षा कमी आकार होईल अशी **jpg /jpeg format** मध्ये दोन वेगवेगळया फाईल्स तयार ठेवाव्यात.

६. उमेदवाराने माहिती भरताना संपूर्ण नावाचे (spelling) त्याच्याजवळ उपलब्ध असलेल्या शैक्षणिक कागदपत्रानुसार अचुक नमुद करावे.

७. उमेदवाराने पत्रव्यवहाराचा अचुक पत्ता व पिनकोडसहीत द्यावा. अर्धवट पत्ता देऊ नये.

८. उमेदवाराने उपयोगात असलेलाच ईमेल आयडी (email id), मोबाईल क्रमांक द्यावा.

९. उमेदवाराने आपली जन्मतारीख, शैक्षणिक कागदपत्रे/जन्मप्रमाणपत्राद्वारे अचुक लिहावी.

२/ .......

१०. उमेदवार विवाहित असल्यास, त्याने अपत्यांविषयीची योग्य ती माहिती त्या—त्या रकान्यात भरावी. विवाहित उमेदवारास आज रोजी अपत्य नसेल किंवा उमेदवार अविवाहीत असेल तर त्याने रकान्यात ''0'' (शून्य) अशी माहिती भरावी.

११. उमेदवाराने त्याच्या शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारे अर्जात अचूक शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेबाबत माहिती भरताना उमेदवाराने त्याची पात्रता खाली दिलेल्या क्रमानुसार नमूद करावी.

१. ७ वी ($7^{th}$ standard)
२. एस.एस.सी. (S.S.C.)
३. एच.एस.सी. (H.S.C.) किंवा तत्सम डिप्लोमा कोणत्याही मान्यता प्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठातून प्राप्त केलेला

१२. शैक्षणिक माहिती भरतांना, जे उमेदवार इयत्ता दहावीपेक्षा कमी शैक्षणिक अर्हता असणारे (Below S.S.C.) आहेत त्यांनी School/Board/University या रकान्यामधे शाळेचे नांव लिहावे.

१३. उमेदवारास ज्या भाषांचे ज्ञान आहे ती भाषा निवड (select) करावी.

१४. उमेदवाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास किंवा पुर्वी एखाद्या प्रकरणात फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती द्यावी. खरी माहिती दडवून ठेवल्यास उमेदवार नियुक्तीस अपात्र ठरेल. नियुक्तीनंतर सदर माहिती प्रशासनाच्या निदर्शनास आल्यास उमेदवारास कोणतीही पूर्वसूचना न देता नोकरीवरुन कमी केले जाईल.

१५. उमेदवाराने त्याला/तिला कमीतकमी ५ वर्षापासून ओळखत असलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींकडून चांगली वर्तणूक व चारित्र्याबाबतचा दाखला (ऑनलाईन जाहिरातीसोबत जोडलेल्या Form 'A' नमुन्यात) प्राप्त करावा आणि अर्ज भरतांना सदरील व्यक्तींची माहिती अर्जात नमूद करावी. सदरील दाखला हा जाहिरात प्रसिद्धीनंतरच्या तारखेचा असावा. सदरील प्रतिष्ठित व्यक्ती हि उमेदवाराची जवळची नातेवाईक/मित्र नसावी.

१६. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात योग्य त्या ठिकाणी, **४० KB** पेक्षा कमी आकार असलेल्या स्वत:च्या स्कॅन **फोटोची** jpg / jpeg format मधील फाईल Upload करावी. सदरील स्कॅन फोटो स्पष्ट दिसणारा असावा.

३/ .......

१७. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात योग्य त्या ठिकाणी, **४० KB** पेक्षा कमी आकार असलेल्या स्वत:च्या स्कॅन **स्वाक्षरीची** jpg / jpeg format मधील फाईल Upload करावी. सदरील स्कॅन स्वाक्षरी स्पष्ट दिसणारी असावी.

१८. अर्ज Submit करण्यापूर्वी उमेदवाराने भरलेला अर्ज बरोबर आहे याची खात्री करावी, Declaration चे वाचन करावे व नंतरच I Agree या बटणावर Click करावे. अर्ज Submit झाल्यावर उमेदवारास अर्जात कोणताही बदल करता येणार नाही.

१९. अर्ज Submit झाल्यानंतर येणारा Registration ID Number उमेदवाराने नमूद करुन घ्यावा आणि Print Application हा पर्याय (option) Select करुन ऑनलाईन अर्जाची Print out काढावी.

२०. सदरील Printout काढल्यानंतर शेवटी दिलेल्या जागेवर उमेदवाराने आपला स्वत:चा फोटो चिटकवावा आणि सोबतच्या रकान्यामध्ये **काळया** पेनाने स्वत:ची सही करावी. सदरील Printout उमेदवाराने आपल्याकडे पुढिल कार्यवाहीसाठी स्वत:जवळ जतन करून ठेवावी.

*************